# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१४०/२०२५ दिनांक- २९/०३/२०२५

## प्रेस नोट

## उत्तन सागरी पोलीस ठाणे येथे जप्त असलेल्या बेवारस दुचाकी वाहनांचे लिलाव

---------------------------------------

उत्तन सागरी पोलीस ठाणे येथे एकुण ०४ दुचाकी बेवारस वाहने बऱ्याच कालावधी पासुन जमा आहेत. सदरचे वाहनाचे मुळ मालकांचा शोध होणेकामी मा. प्रादेशीक परिवहन अधिकारी ठाणे, कल्याण, अंधेरी, वडाळा यांना पत्रव्यवहार करुन माहीती प्राप्त करण्यात आली असुन त्या अनुशंगाने नमुद वाहन मालकांना पत्रव्यवहार करण्यात आला होता परंतु अदयाप पावेतो कोणीही मालक त्यांची मालकी सिध्द करणेकामी आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर राहीलेले नाहीत. त्यामुळे नमुद वाहनाचा दि.०४.०४.२०२५ रोजी जाहीर लिलाव करावयाचा आहे.

मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सो. भाईंदर विभाग यांचेकडुन सदर वाहनांचा लिलाव करण्याबाबत परवानगी प्राप्त केली आहे. तसेच मा. प्रादेशिक परिवहन विभाग, ठाणे यांचे कडुन नमुद बेवारस दुचाकी वाहनांचे मुल्यांकन करुन घेण्यात आलेले आहे. सदरच्या वाहनांचा सरकारी नियमानुसार लिलाव करण्यात येणार असुन ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी दि. ०२/०४/२०२५ रोजी पुर्वी उत्तन सागरी पोलीस ठाणे येथे संपर्क करावा असे अहवान श्री. शिवाजी नाईक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उत्तन सागरी पोलीस ठाणे, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी केले आहे.

------------ooooooo---------------